भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. १९९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १८/०४/२०१८

**१) जुने वादावरुन विटाने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १७/०४/२०१८ चे १६.०० वाजता यातील फिर्यादी व आरोपी हे एकाच मोहल्यात राहत असुन एकाच जातीचे आहेत दोघानमध्ये जुने वाद सुरु असुन यातील फिर्यादी हा आपले घरी परीवारासह हजर अतांना घराचे बाजुला भिंतीचे बांधकाम सुरु असतांना यातील आरोपीतांनी फिर्यादीचे घरा समोर येवुन शिवीगाळ करुन फिर्यादीला आरोपीतांनी डोक्यावर व फिर्यादीचे पत्नीला डावेहाताचे मनगटावर विटाने मारुन जखमी केले व जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी याचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १६०,५०४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. काटेखाये पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**२) शिवीगाळ करुन मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १७/०४/२०१८ चे १६.३० वाजता यातील फिर्यादी व आरोपी हे एकाच मोहल्यात राहत असुन एकाच जातीचे आहेत दोघानमध्ये जुने वाद सुरु असुन यातील आरोपी क्र. १ हा भिंतीचे बांधकाम करीत असतांना फिर्यादीने भिंतीचे काम करु नको, असे हटकले असता यातील आरोपीने फिर्यादीला वाईट— वाईट शिवीगाळ करुन मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी उमर फारुख मतीकर अन्सारी वय ३२ वर्ष, रा. बाबा मस्तानशाह वार्ड भंडारा याचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १६०,५०४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चोपकर पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**३) क्षुल्लक कारणावरुन शिवीगाळ व मारपीट केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १६/०४/२०१८ चे ८.३० वाजता यातील आरोपीने फिर्यादी जखमी पत्नीस तु भाजी चांगली बनवली नाही म्हणुन भाजीच्या गंजाला जोराने ढकलल्याने गरम भाजी फिर्यादीचे अंगावर सांडुन फिर्यादीस जखमी करुन शिवीगाळ व मारपीट केल्याने जखमी फिर्यादी सौ. संगीता जगदीश मरकाम वय ३५ वर्ष, रा. पलाडी याचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३२४,५०४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. नवखरे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**४) शेतातील ऊस पिक व प्लॉस्टीक पाईप जाळुन नुकसान केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक ०७/०४/२०१८ चे १०.०० चे १०.३० वाजता दरम्यान यातील संशयीत आरोपीने फिर्यादी याचे गट क्र. ३२० मध्ये ऊस पिक लावलेल्या शेत जमीनीला लागुन असलेला शिवधुरा जाळल्याने त्या शिवधुऱ्याची झाक फिर्यादीचे शेतातील ऊस पिकाला लागुन अंदाजे पाऊन एकरातील ऊस पिक व त्यामध्ये लावलेले सुक्ष्म ठिंपक योजनेचे प्लॉस्टीक पाईप अंदाजे किंमती ७० ते ८० हजार रुपयाचे नुकसान झाल्याने फिर्यादी अविनाश गणपतराव हातझाडे वय ५२ वर्ष, रा. कोका याची तक्रार व चौकशी अहवाला वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २८५ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सेलाकर पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**५) दखलपात्र गुन्हा करण्याचे बेताने मिळुन आल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १७/०४/२०१८ चे ०३.०० वाजता दरम्यान यातील आरोपी हा अंधराचा फायदा घेवुन आपले अस्तित्व लपवुन दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्येशाने लपुन मिळुन आल्याने, त्याला विचारपुस केले असता उडवा उडवीचे उत्तर देवुन समाधान कारक उत्तर न दिल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. गिऱ्हेपुंजे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १२२ मपोका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गिऱ्हेपुंजे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**६) दखलपात्र गुन्हा करण्याचे बेताने मिळुन आल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १७/०४/२०१८ चे ०३.०० वाजता दरम्यान यातील आरोपी हा अंधराचा फायदा घेवुन बसुन आपले अस्थीत्व लपवुन दखलपात्र गुन्हा करण्याचे बेताने मिळुन आला व त्यास विचारपुस केले असता उडवा उडवीचे उत्तर दिल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. बागडे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १२२ मपोका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**७) आमरोड वर येणा—या जाणा—या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १७/०४/२०१८ चे १३.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील आटो वाहन ही मुरमाडी तुप येथे आमरोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभी करून मिळुन आल्याने, सरतर्फे फिर्यादी पोना. तिजारे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. भलावी पोलीस स्टेशन पालांदुर करीत आहेत.

**८) अपघातात जखमी होवुन इसमाचा मृत्यु :—**

दिंनाक ११/०४/२०१८ चे १७.३० वाजता दरम्यान यातील मृतक कवळु ईस्तारी तुपटे वय ४० वर्ष रा. खैरना हा ट्रॅक्टर घेवुन अडयाळ पहाळी वरून भावड मार्गे खैरना येथे जात असता पिंपळगाव निपानी गावाजवळ अपघात झाल्याने, जखमी होवुन औषधोपचार करीता सामान्य रूग्नालय भंडारा येथे नेले असतांना डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केल्याने, पो.स्टे. भंडारा मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी मपोना. टेभुर्णे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि.डोंगरे पोलीस स्टेशन अडयाळ करीत आहेत

**९) उपचारा दरम्यान वृध्द महिलेचा मृत्यु :—**

दिंनाक १३/०४/२०१८ चे ००.३० वाजता दरम्यान यातील मृतक श्रीमती गंगाबाई माधव काळे वय ७२ वर्ष रा. लावेश्वर हीचे पोटात दुखत असल्याने तीला औषधोपचारा करीता डॉ. चव्हाण भंडारा यांचे कडे नेवुन उपचारा करुन पुढील उपचार करीता मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान दि. ०४/०४/२०१८ ला मरण पावल्याने पो. स्टे. अजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जा.फौ कागदपत्र आज रोजी प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. मारबते यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोलीस स्टेशन वरठी करीत आहेत

१२) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक १७/०४/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ११६ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी वाहतुक– ०५, तीन सिटर वाहनाकरीता– १० ईतर वाहनांवरती – १०१ केसेस करण्यात आले आहे.

18.4.18

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.